


IRBK-0101977
IRBK-0101977

# सुलभ महाभारत

## भाग पांचवा

म. ग्रं. सं. ठाणे.
वा. ४५. ८२

लेखक

विठ्ठल दत्तात्रेय चिंदरकर

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
वा. क्र. १९८७६ नों. दि ..............
वि. बा:बा. क्र. ..................

महाराष्ट्र-ग्रंथभांडार, मुंबई ४

“सुलभ महाभारत” या ग्रंथमालेचा हा पांचवा भाग असून मूळ व्यासकृत महाभारतांतील पुढील कथा यांत घेतल्या आहेत.


| | | |
|---|---|---|
| १ | नल-दमयंती | ३ |
| २ | वातापीचा वध | ३२ |
| ३ | वृत्रासुराचा वध | ३३ |
| ४ | गंगावतरण | ३५ |
| ५ | ऋष्यशृंग मुनि | ३७ |


किंमत ८ आणे


प्रथमावृत्ति १९४५



सर्वाधिकार प्रकाशकाधीन



प्रकाशक—शंकर वामन कुलकर्णी, महाराष्ट्र-ग्रंथभांडार, मुंबई नं. ४
मुद्रकः—मि. विल्यम कूपर, ‘न्यू जॅक् प्रिं. वर्क्स’ लि., भायखळा मुंबई

# नल-दमयंती

पूर्वी निषध देशामध्यें वीरसेन नांवाच्या राजाचा पुत्र नल राजा होऊन गेला. हा अश्वविद्येमध्यें मोठा पंडित होता. तो पराक्रमी होता तसाच सगळ्या विद्यांमध्येंही पारंगत होता. त्याला फांसे खेळण्याची म्हणजे द्यूत (जुगार) खेळण्याची फार आवड असे. या नळाच्या बायकोचें नांव दमयंती.

दमयंती ही विदर्भ (वऱ्हाड) देशाच्या राजाची कन्या. त्या राजाला दम, दान्त, दमन असे तीन पुत्र आणि दमयंती कन्या अशीं चार अपत्यें होतीं. दमयंती रूपानें तर केवळ सुंदर होतीच पण गुणांनीं आणि विद्येनेंही परिपूर्ण होती. राजा नल याचें रूप, त्याचा पराक्रम आणि त्याचे गुण यांची कीर्ति तिच्या कानीं जेव्हां गेली तेव्हां ती सुंदर राजकुमारी त्याच्यावर मनांतून प्रेम करूं लागली. दमयंतीची प्रीतीही नलाच्या कानावर गेली होती. ती आपली पत्नी होईल तर आपल्यासारखा भाग्यवान् दुसरा कोणी नाहीं असें नलाला वाटे. तो एकसारखा दमयंतीचा ध्यास घेऊन बसला. तिच्या चिंतनावांचून त्याला कांहींच सुचेना.

एकदां तो दमयंतीचें स्मरण करीत आपल्या बागेंतील तळ्याजवळ फिरत असतां सुंदर हंसपक्षी त्याच्या दृष्टीला पडले. त्या हंसांचीं शरीरें आणि पंख जसे काय सोन्याचे घडविले होते. उन्हाच्या प्रकाशांत ते पंख तेजानें चमचम करीत होते. हंसांना पाहून राजाच्या मनाला विरंगुळा वाटला. एकादा हंस आपण पकडावा अशी राजाच्या मनांत इच्छा झाली. म्हणून तो हलकेच हंसांच्या मागून धांवूं लागला. राजाची चाहुल

लागून हंस पळाले. पण एक हंस राजाच्या हातीं लागलाच. तो राजाच्या हातांतून सुटण्यासाठीं तडफडूं लागला. पण नलानें त्याला घट्ट पकडून ठेविलें होतें. हा राजा आतां आपणांस मारून टाकतो कीं काय असें हंसाच्या मनांत भय उत्पन्न झालें. कोणत्या उपायानें राजाला खूष करावें म्हणजे तो आपणास सोडून देईल याचा हंस विचार करूं लागला. इतक्यांत त्याला आठवलें कीं विदर्भ देशींची राजकन्या दमयंती हिला आपण नुकतीच पाहिली आहे. तिच्या अनुपम लावण्याची तारीफ राजाकडे केली तर हा सुंदर राजा खात्रीनें खूष होईल.

तेव्हां हंस मनुष्यवाणीनें राजाला म्हणाला, "हे राजा, तूं मला सोडून दे. मी माझ्या सखीसह विहार करीत होतों.



तूं मला पकडल्यामुळें माझी सखी खिन्न मुद्रेनें ती पहा त्या वृक्षाच्या शाखेवर बसून इकडे पहात आहे. आमची तूं ताटातूट करूं नकोस—"

" हंसा, मीं तुला सोडून दिलें तर तूं मला काय देशील?"

" राजा, मी क्षुल्लक पक्षी. सोन्यासारखा दिसलों तरी सोनें खास नाहीं. मी गरीब तुला काय देणार? पण माझ्या अंगकांतीशीं स्पर्धा करील अशी जिची अंगकांति आहे, जिची चालण्याची ढब हुबेहुब माझ्यासारखी असून जिला हंसगति म्हणतात, अशी विदर्भराजकन्या दमयंती तुला मिळवून देण्याची खटपट करीन. खरेंच राजा, त्या सुंदरीला तूंच एक अनुरूप वर आहेस."

" हंसा, खरेंच कारे इतकी सुंदर आहे ती?"

" राजा, हें काय विचारतोस? मी माझ्या सखीसह नुकताच विदर्भ देशांत विहार करून आलों. तेथें जलविहार करण्यासाठीं ती राजकन्या आपल्या सखींसह आली होती. तिला पाहून मीं मनांत म्हटलें, हिला योग्य वर जर कोणी असेल तर आमचा नल राजाच."

" हंसा, हें तूं खरंच कारे म्हणतोस? तूं किती चांगला आहेस रे? तुझ्यासारख्या माझ्या हितचिंतकाला असें पकडून पारतंत्र्यांत ठेवणें मला उचित नाहीं. जा. मी तुला सोडून देत आहें. आजपासून तूं माझा मित्र झालास."

" राजा, तूं किती दयाळु आहेस! या दयाळु अंतःकरणाची स्वामिनी व्हायला एकटी दमयंतीच लायक दिसते—"

" मग मित्रा, तूं माझें प्रिय कार्य कसें करशील?"

" राजा, मी तुझा दूत होऊन त्या राजकन्येकडे जातों. तूं तिच्यावर प्रीति करीत आहेस हें तिला कळवितों आणि

तिचा काय मानस आहे हें तुला येऊन सांगतों—"

"वा! वा! मित्रा, पाखरूं असूनही तुझी बुद्धि किती मोठी आहे रे! जा. तूं आजच येथून गमन कर—"

राजा हंसावर अगदीं खूष होऊन गेला. हंस तेथून उडाला तो वृक्षावरील आपल्या सखीला प्रथम जाऊन भेटला आणि तिचा निरोप घेऊन तो विदर्भ देशाकडे उडूं लागला. बरोबर त्यानें सोबतीही घेतले होते.

योग्य वेळीं हंस राजकन्येच्या मंदिराजवळ येऊन दाखल झाला. त्याचे इतर हंस सोबतीही राजकन्येच्या बागेंत हिंडूं लागले. त्या सुंदर हंसांना पाहून राजकन्येच्या सख्या त्यांना पकडण्यासाठीं धांवूं लागल्या. सख्या दूर गेल्या आहेत असें



पाहून नलानें पकडलेला हंस राजकन्येजवळ जाऊन एका कारंजावर बसून मनुष्यवाणीनें बोलूं लागला, " हे दमयंती, मी नलराजाचा दूत होऊन तुला निरोप घेऊन आलों आहें. तो थोर राजा तुझ्यासाठीं मनांत झुरत आहे. त्याला वरून तूं त्याला धन्य कर. तुझ्यासारख्या सुंदर राजकन्येला नलासारखाच वर योग्य होईल."

हंसाची ती मधुर वाणी ऐकून दमयंतीला धन्यता वाटली. ती आनंदानें आणि लज्जेनें फुलून गेली. बराच वेळ ती कांहीं बोलेचना. तेव्हां तो हंस पुनः म्हणाला, " राजकन्ये, तुझें मनोगत मला लवकर कळूं दे. नाहीं तर त्या तुझ्या सख्या इतक्यांत इकडे येतील."

दमयंती हंसाला हळूच म्हणाली, " हे हंसदूता, तुझा विजय असो. तूं त्वरित जाऊन माझें मनोगत त्या थोर राजाला निवेदन कर. मी अधिक कांहीं सांगत नाहीं. तुझ्यासारख्या चतुराला माझें मनोगत ओळखतां येणें कठीण नाहीं."

इतक्यांत राजकन्येच्या दासी दमूनभागून तेथें आल्या. तेव्हां तो हंस तेथून उडून निघून गेला.

## दमयंतीचें स्वयंवर

त्या दिवसापासून दमयंती नलाचेंच चिंतन करूं लागली. हंसाचा निरोप नलाला मिळाला. तोही आतां दमयंतीचा ध्यास घेऊन बसला. आपलें हितगुज दमयंतीनें आपल्या सख्यांना सांगितलें. सख्यांनीं दमयंतीच्या आईला सांगितलें. आणि राजाला हें कळल्यावर त्यानें दमयंतीचें स्वयंवर करण्याचें ठर-

विलें. त्याप्रमाणें देशोदेशींच्या राजांना स्वयंवरासाठीं आमंत्रण गेलीं. नलानेंही स्वयंवरास जाण्याचें ठरविलें. नलराजा स्वयंवरासाठीं विदर्भ देशाला निघाला. वाटेंत त्याला स्वयंवरासाठीं निघालेले इंद्र, अग्नि, वरुण आणि यम हे भेटले. नलाचें रूप पाहून त्यांना आनंद वाटला, तसाच मत्सरही वाटला. या सुंदर पुरुषाला सोडून दमयंती आपणास कसची वरते असें त्यांना वाटलें. तेव्हां कांहींतरी करून नलाला फसविण्याचें त्यांनीं ठरविलें.

इंद्र नलाकडे जाऊन म्हणाला, " हे नला, तूं सत्यनिष्ठ आहेस. तूं आमचा दूत होऊन आमची कामगिरी करावीस अशी आमची इच्छा आहे. "

नलानें उत्तर केलें, " आपली आज्ञा मला प्रमाण आहे ! "

तेव्हां इंद्र त्याला म्हणाला, " आम्ही दमयंतीच्या स्वयंवरासाठीं चाललों आहों. तूं आमचा दूत होऊन गुप्तरूपानें दमयंतीकडे जा आणि ' आम्हांपैकीं एकाला पसंत कर ' असें तिला सांग. यासाठीं तूं तिचें मन वळव. "

" देवा, ही कामगिरी मोठी कठीण आहे. मीही दमयंतीच्या स्वयंवरासाठीं चाललों आहें. दमयंती माझ्यावर अनुरक्त आहे. ती माझी पत्नी व्हावी अशी माझीही इच्छा आहे. आपलें अंतःकरण तिनें हंसापाशीं मोकळें करून मला निरोप पाठविला आहे. अशा स्थितींत हें काम मीं कसें करावें ? "

" नला, तूं सत्यवचनी आहेस. सत्यवचनी माणसें एकदां दिलेला शब्द मागें घेत नसतात. तूं आमचें दूतकार्य केलें पाहिजेस. "

" मी वचन देऊन तर चुकलोंच आहें. मी आपलें कार्य करीन पण गुप्तरूपानें मी कसा जाणार ? "

" त्याची आम्ही व्यवस्था करूं. तूं कुणाला दिसणार नाहींस. फक्त दमयंतीच्या महालांत तूं प्रकट होशील. "

मोठ्या खिन्न मनानें नल राजा देवांचा दूत होऊन दमयंतीच्या अंतःपुरांत शिरला. तो कोणाला दिसत नव्हता. त्याला मात्र सर्व दिसत होतें. दमयंती आपल्या सख्यांसह बसली होती. नल तेथें जातांच तो उघड दिसूं लागला.

नलाला पाहातांच दमयंती आणि तिच्या सख्या चकितच होऊन गेल्या. परपुरुषाचा प्रवेश आपल्या अंतःपुरांत कसा झाला हें त्यांना कळेना. त्या नलाला घालवूनच देणार होत्या.



पण त्याचें अप्रतिम रूप पाहून त्यांच्या मनाला भूल पडली.

नल म्हणाला, " मी इंद्र, वरुण, अग्नि आणि यम या देवांचा दूत होऊन आलों आहें. माझें नांव नल राजा. देवांची अशी इच्छा आहे कीं, उद्यां स्वयंवरामध्यें दमयंतीनें त्यांच्यापैकीं एकाला माळ घालावी. "

नलाला पाहून दमयंतीच्या अंतःकरणाची मोठी चमत्कारिक स्थिति होऊन गेली आणि तो देवांना वरण्याबद्दल आपणास सांगत आहे याचें तिला दुःख झालें.

ती दुःखानें नलाला म्हणाली, " महाराज, ही विचित्र गोष्ट आपण कां करायला सांगतां ? त्या हंसाबरोबर आपण जो निरोप पाठविला तो खोटाच का ? "

" दमयंती, मी देवांचा दूत होऊन येथें आलों असल्यामुळें मला त्यासंबंधानें कांहींच बोलतां येत नाहीं. मीं देवांचा निरोप तुला सांगितला. तुझ्या मर्जीस येईल त्याप्रमाणें तूं कर. "

" ठीक आहे. मला निरोप पोंचला असें देवांना जाऊन सांगा. स्वयंवराच्या वेळीं जो पुरुष माझ्या मनास येईल त्याला मी माळ घालीन असें त्यांना सांगा. आपण मात्र स्वयंवरास येण्याचें टाळूं नये. कारण मी आपणालाच वरणार आहें. "

दमयंतीचा निरोप घेऊन नल देवांकडे गेला. जशी हकीगत घडली होती तशी त्यानें निवेदन केली. तेव्हां देवांनीं असें ठरविलें कीं, आपणही देवांचें रूप टाकून नलाचें रूप धारण करायचें. म्हणजे खरा नल कोणता हें दमयंतीला कळणार नाहीं. याप्रमाणें ठरवून ते दमयंतीच्या स्वयंवरासाठीं मंडपांत जाऊन बसले. देवांच्या बरोबर नलही जाऊन बसला. त्यामुळें एका रांगेनें पांच नल बसलेले दिसत होते.

दमयंती हातांत माळा घेऊन फिरत फिरत नल बसले होते तेथें आली. पांच नलांना पाहून तिला आश्चर्य वाटलें. तसेंच देवांचें कपटही तिच्या ध्यानीं आलें. आतां खऱ्या नलाला

कसें ओळखावें याची तिला पंचाईत पडली. तिनें इंद्र, वरुण, अग्नि आणि यम यांची भक्तिपूर्वक स्तुति केली. ती म्हणाली, "देवहो, या मुलीला तुमचा आशीर्वाद असूं द्या. मीं नलाला पूर्वीच मनानें वरलें आहे. आतां मी दुसऱ्या कुणाची पत्नी होणें अशक्य आहे. तरी तुमच्या या मुलीला माझ्या मनानें वरलेल्या पतीला ओळखण्याचें सामर्थ्य द्या."

दमयंतीच्या स्तुतीनें देवांना तिची करुणा आली. नलावरच तिची अंतःकरणपूर्वक प्रीति आहे हें त्यांना दिसून आलें. अशा पतिव्रतेला फसविणें त्यांना बरें दिसलें नाहीं. त्यांनीं दमयंतीचें प्रिय करण्याचें ठरविलें. देवांनीं लगेच आपलीं मूळ रूपें धारण केलीं.

आणि दमयंतीनें मोठ्या आनंदानें खऱ्या नलाला माळ घातली.

इंद्रादि देवानीं नलाला आठ वर दिले. इंद्रानें 'यज्ञांत आपलें प्रत्यक्ष दर्शन होईल आणि सद्गति मिळेल' असे दोन वर दिले. अग्नीनें 'वाटेल त्या ठिकाणीं आपली उत्पत्ति आणि तेजस्वी लोकांची प्राप्ति' असे दोन वर दिले. यमानें 'अन्नरस आणि धर्मावर अतिशय निष्ठा' हे वर दिले. वरुणानें 'ज्या ज्या ठिकाणीं त्याच्या इच्छेला वाटेल त्या त्या ठिकाणीं जल उत्पन्न होणें आणि उत्कृष्ट प्रकारच्या सुगंधी पुष्पमाला' हीं अर्पण केलीं.

विदर्भ नगरांत कांहीं काळ राहून नलराजा दमयंतीसह आपल्या नगराला निघून गेला.

## जुगारापायीं राज्यहरण

दमयंतीच्या स्वयंवरासाठीं कलीही निघाला होता. वाटेंत

त्याला इंद्रादि देव भेटले. त्यांनीं दमयंतीनें नलाला माळ घातल्याचें सांगितलें. त्यामुळें कलीला वाईट वाटलें. नलाचा नाश करण्यासाठीं तो बरींच वर्षें संधि पाहूं लागला. एकदां हातपाय न धुतांच नल संध्या करण्यास बसला आहे अशी संधि साधून कलीनें नलाच्या शरीरांत प्रवेश केला. त्या दिवसापासून नलाच्या हातून धर्मबाह्य आचरण होऊं लागलें.

नलाचा पुष्कर नांवाचा एक भाऊ होता. तो कलीच्या प्रेरणेनें नलाकडे द्यूत खेळण्यासाठीं आला. पुष्कराच्या मनांतून राज्य आपणास मिळावें असें होतें. आतां त्याला कलीचें साहाय्य मिळाल्यामुळें तो द्यूतामध्यें नलाला हरवूं लागला. नलाचें वैभव हळूहळू संपूं लागलें. दमयंतीनें नलाला 'द्यूत खेळूं नका' असें सांगून पाहिलें. राज्यांतील शहाण्या लोकांनीं नलाला उपदेश केला. पण नल कोणाचेंच ऐकेना. तो इरेला पेटला. प्रत्येक जुगारी असाच इरेला पेटत असतो. आणि सर्वस्व हरण झालें कीं त्याचे डोळे उघडतात. नलाचेंही असेंच झालें. त्याचें राज्य जुगारापायीं पुष्कराकडे गेलें. आणि अंगावर घेण्यास वस्त्रही राहिलें नाहीं. पुष्करानें त्याला राज्यांतून घालवून दिलें. दमयंती फाटक्या वस्त्रानिशीं नलाबरोबर बाहेर पडली. आपलीं दोन मुलें इंद्रसेन आणि इंद्रसेना दमयंतीनें आपल्या माहेरीं पाठवून दिलीं होतीं. वार्ष्णेय नांवाचा नलाचा एक विश्वासू सारथी होता. त्याच्याबरोबर आपलीं मुलें तिनें पाठविलीं. वार्ष्णेय अयोध्येच्या ऋतुपर्ण राजाच्या पदरीं नोकरीला राहिला.

वाटेंत नल दमयंतीचें अर्धें वस्त्र नेसून फिरत होता.

नलाला दमयंतीचे हाल पहावेनीत. तो तिला म्हणाला, "दमयंती, हा रस्ता विदर्भ देशाकडे जातो. तूं आपल्या माहेरीं निघून जा. वनवासाचे हाल तुझ्यानें सोसवणार नाहींत. मी तर काय भणंग भिकारीझालों. तुझ्यासारख्या सुकुमार स्त्रीला माझ्यापासून त्रास कां? तूं आपल्या माहेरीं जाऊन सुखांत राहा."



"माहेरीं जायचेंच तर आपणही माझ्याबरोबर यावें."

"आलों असतों. तुझें माहेर तें माझेंही घरच आहे. पण अशा विपन्नावस्थेंत तेथें जाणें बरें नाहीं. तूंच जा."

"पतीला विपन्नावस्थेंत सोडून पत्नी माहेरीं जात नसते हें आपणाला मीं सांगावें असें नाहीं. तुम्ही जें दुःख भोगाल त्यांत मीही वांटेकरी होईन. कोणत्याही दुःखांत पतीच्या सहवासासारखें दुसरें औषध नाहीं."

"खरेंच दमयंती. मी तुझा त्याग करूं शकत नाहीं. मोठ्या कष्टानें तुला जा म्हणत आहें."

# दमयंतीचा त्याग

त्यांचें राज्य गेलें असल्यामुळें त्यांना पुष्कराच्या राज्यांत वास्तव्य करतां येत नव्हतें. फिरत फिरत तीं दोघें चाललीं असतां वाटेंत एक घर लागलें. तेथें विश्रांति घेण्यासाठीं तीं थांबलीं. चालण्याचे श्रम, भूक आणि तहान यांनीं त्यांना अतिशय थकवा आला होता. दमयंती निःशंकपणें तेथें पडली. नळही बाजूला पडून राहिला. दमयंती लगेच गाढ झोंपी गेली. नळाला मात्र झोंप येत नव्हती. तो उठून बसला. दमयंतीला गाढ झोंप लागली आहे असें पाहून तिला सोडून जाण्यास ही संधि बरी आहे असें त्याला वाटलें. विदर्भ देशाचा रस्ता तिला दाखविलाच आहे. आपण पळून गेलों असें पाहून ती थोडा वेळ दुःख करील आणि मग निराशेनें आपल्या मुलांकडे जाईल, असा नलानें विचार केला. दुःख भोगणें आपल्या नशिबीं आलेंच आहे. त्यांत तिला आणखी दुःख कां ? असा विचार



करून नळानें अर्धें वस्त्र फाडलें. आणि मोठ्या जड अंतःकरणानें दमयंतीचा त्याग करून तो तेथून निसटला.

दमयंतीला जेव्हां जाग आली तेव्हां तिला असें दिसून आलें कीं आपल्या शेजारीं झोंपलेला नळ जाग्यावर नाहीं ! ती दचकून उठली. आपलें अर्धें वस्त्र फाडलेलें आहे असें तिला दिसून आलें. तिनें नलाला हांका मारल्या. आजूबाजूला त्याचा शोध केला. पण तो तिला कुठेंच आढळला नाहीं. तेव्हां निराशेनें ती रडूं लागली. त्या निर्जन रानांत ती एकटी पांखरासारखी हिंडूं लागली. मुखानें नलाला हांका मारूं लागली. पण तिचा नल कुठें होता ? तो केव्हांच तिला सोडून दूरदूर गेला होता.

## अजगराच्या मुखीं

दमयंती त्या घोर अरण्यांत वाट दिसेल तिकडे चालली असतां एक भयंकर अजगर आपल्यापुढें 'आ' वासून येत आहे असें तिच्या दृष्टीस पडलें. तिला अजगराची भीति वाटली नाहीं. भीति वाटली ती अशासाठीं कीं आतां यापुढें आपल्या नशिबीं आपल्या पतीची भेट नाहीं. अजगर पुढें पुढें आला. तो दमयं-



तीला आस्ते आस्ते गिळूं लागला. ती नलाचा धांवा करूं लागली. पतीच्या भेटीसाठीं तिचा जीव व्याकुळ झाला.

ती अशी आक्रोश करीत असतां रानांत शिकारीसाठीं आलेला एक पारधी तेथें येऊन दाखल झाला. कुणातरी एका लावण्यवती स्त्रीला अजगर गिळीत आहे असें पाहून तो तांतडीनें पुढें धांवला. त्यानें आपल्या जवळच्या हत्यारानें अजगराला तोंडाकडून उभा चिरला. त्यामुळें दमयंतीची मुक्तता झाली. अजगर खालीं मरून पडला. पारध्यानें जवळच्या झऱ्याचें पाणी आणून दमयंतीला अंग स्वच्छ करायला लावलें आणि मोठ्या आपुलकीनें तिची विचारपूस केली. दमयंतीनें आपल्या दुर्दैवाची कहाणी त्याला सांगितली.

तो पारधी तिच्या अर्ध्या उघड्या शरीराकडे पाहात होता. तिच्या लावण्याचा त्याला मोह पडला. तो आपणाला वश होण्याबद्दल तिची मनधरणी करूं लागला. दमयंतीनें त्याची अनेक प्रकारें समजूत केली. पण पारधी मोहापासून दूर होईना. तेव्हां दमयंती भारीच रागावली. संतापून ती म्हणाली, “ मीं नलावांचून अन्य पुरुष मनांतही आणला नाहीं हें खरें असेल तर या दुष्ट पारध्याचा येथें अंत होवो ! ”

तिच्या तोंडून ही शापवाणी बाहेर पडते न पडते तोंच पारधी गतप्राण होऊन खालीं पडला.

त्याला तेथेंच टाकून दमयंती नलाचा शोध करण्यासाठीं तेथून निघाली.

## व्यापाऱ्यांची सोबत

अशा रीतीनें अनेक वनें चालत चालत जात असतां एके

दिवशीं एक लमाणांचा तांडा तिला भेटला. व्यापारी लोक शेंकडों बैल, घोडे, हत्ती घेऊन व्यापारासाठीं दूर देशांत चालले होते. दमयंती त्यांना रस्त्यांत आढळली. त्यांनीं तिची चौकशी केली आणि दया येऊन आपणाबरोबर चलण्यास त्यांनीं तिला सांगितलें. पुढें चालत चालत जात असतां एका सरोवराच्या कांठीं ते व्यापारी विश्रांति घेण्यासाठीं बसले. त्यांनीं तेथेंच आपलें जेवणखाण आटोपलें आणि ते रात्रींच्या वेळीं झोंप घेत तेथेंच पडले.

रात्रींच्या वेळीं हत्तींचा एक कळप फिरत फिरत त्या ठिकाणीं आला. त्या लमाणांबरोबरच्या जनावरांना पाहून त्या रानटी हत्तींना चीड आली. ते त्यांच्यावर तुटून पडले. त्यांनीं व्यापाऱ्यांच्या जनावरांची दाणादाण उडविली. त्या गर्दींत झोंपलेल्या व्यापाऱ्यांच्या अंगावरूही रानहत्ती गेले. त्यामुळें कित्येक व्यापारी ठार झाले. त्यांच्या सामानाची नासधूस झाली. जो तो वाट फुटेल तिकडे पळूं लागला.

कांहीं वेळानें सर्वत्र स्थिरस्थावर झाल्यावर व्यापारी लोक एकत्र जमून म्हणूं लागले, " त्या स्त्रीला आपण बरोबर घेतलें त्यामुळेंच हें संकट आपणावर आलेलें दिसतें. तरी तिला आधीं ठेंचून ठार केली पाहिजे. कुणीतरी चेटकी बाई दिसते. " असें म्हणून ते दमयंतीचा शोध करूं लागले.

दमयंतीनें त्यांचें बोलणें आडून ऐकलेंच होतें. ती तेथून धूम पळत सुटली. त्या व्यापाऱ्यांबरोबर कांहीं ब्राह्मणही प्रवास करीत होते. त्यांच्याबरोबर ती मार्गक्रमण करूं लागली.

## दमयंतीचा दासीवेष

सायंकाळच्या सुमारास दमयंती चेदी देशाचा राजा

सुबाहु याच्या नगरांत येऊन दाखल झाली. प्रवासाचे श्रम, बरेच दिवस पोटभर अन्न नाहीं, दुःखी मन, यांमुळें ती एकाद्या वेडीसारखी दिसत होती. ती नगरांतून जाऊं लागली तेव्हां लोक तिच्या रूपानें चकित होऊन तिच्याकडे पाहातच राहिले. वेडी समजून लहान मुलें तिच्या भोंवतीं गोळा झालीं आणि तीं



तिला खडे मारूं लागलीं. मुलांच्या तावडींतून कशी सुटका करून घ्यावी याचा दमयंती विचार करीत होती. इतक्यांत ती चेदी राजाच्या राजवाड्याबाहेर येऊन दाखल झाली. राजवाड्याच्या गच्चीवर बसून राजमाता बाहेरील शोभा पाहात होती. तिचें लक्ष या वेड्या दमयंतीकडे गेलें. ती आपल्या दासीला म्हणाली, " त्या मुलीला तीं पोरें त्रास देत आहेत पहा. तिला माझ्याकडे घेऊन ये पाहूं."

थोड्या वेळानें दासी दमयंतीला घेऊन आली. राजमातेनें दमयंतीला खालीं बसवून तिची विचारपूस केली. आपलें नांव-गांव तेवढें वगळून दमयंतीनें आपल्या दुर्दैवाची हकीकत राज-मातेला सांगितली, तेव्हां राजमातेला तिची दया आली आणि ती तिला म्हणाली, "तूं आतां येथेंच माझ्याजवळ राहा. तुझ्या पतीचा आपण येथून शोध करूं. तो फिरत फिरत कदाचित् या नगरांतही येईल आणि तुझी भेट होईल."

दमयंतीनें राजमातेला नमस्कार करून उत्तर दिलें, "मी कांहीं अटींवर आपणाकडे राहीन. मी कुणाचेंही उष्टें खाणार नाहीं. कोणाचेही पाय धुणार नाहीं. परपुरुषाशीं भाषण करणार नाहीं. माझ्यावर कोणीं वाईट नजर ठेविली तर आपण त्याला शिक्षा केली पाहिजे. एकदां शिक्षा करून कोणी पुनः त्रास द्यायला लागला तर त्याचा वध करण्याची शिक्षा व्हावी. पतीचा शोध करण्यासाठीं मी ब्राह्मणांचें मात्र दर्शन घेईन."

राजमातेनें दमयंतीच्या या सर्व अटी मान्य केल्या आणि आपली कन्या सुनंदा हिला मैत्रीण म्हणून ती अर्पण केली. सुनंदेला दमयंती फारच आवडली.

## नलाला सर्पदंश

दमयंतीचा त्याग करून नल जो निघाला तो एका घोर अरण्यांत येऊन दाखल झाला. तेथें अरण्याला आग लागली असून कोणीतरी मदतीसाठीं ओरडत आहे असें नलानें ऐकलें. लागलाच तो धांवत तेथें गेला. तेथें एक प्रचंड नाग वेटोळें करून ओरडत असलेला त्यानें पाहिला. नलाला पाहा-

तांच तो नाग म्हणाला, " नला, मी कर्कोटक नांवाचा नाग आहें. नारदाच्या शापानें या घोर अरण्यांत येथें येऊन पडलों आहें. त्याच्या शापामुळें मी दगडासारखा होऊन राहिलों आहें. तुझ्या हातून माझा उद्धार होईल. आतां तूं माझें या अग्नीपासून रक्षण कर. मी तुझें प्रिय करीन."

नल आंत शिरला आणि त्या नागाला ओढत बाहेर पडला. बाहेर पडून कांहीं पावलें गेल्यावर तो नाग नलाला



कडकडून चावला ! त्याचा दंश होतांच नलाचें पूर्वीचें रूप नाहींसें झालें.

तो नाग नलाला म्हणाला, "तुझें प्रिय करण्यासाठींच मीं तुला दंश केला. तुला माझें विष बाधणार नाहीं. मात्र तुझें अंग आजपासून निळें होईल. ज्या कलीमुळें तूं सध्यांचें दुःख भोगीत आहेस तो तुझ्या शरीरांतला कली मात्र माझ्या विषामुळें नेहमी अस्वस्थ होईल. तुला आतां कशापासूनही भीति

नाहीं. तुला कोणी ओळखणार नाहीं. आतां तूं येथून अयोध्या नगरांत ऋतुपर्ण राजाकडे जा. तेथें बाहुक या नांवानें सारथी म्हणून रहा. ऋतुपर्ण राजा जुगार खेळण्यांस पटाईत आहे. तूं त्याला अश्वविद्या शिकवून त्याची विद्या संपादन कर. म्हणजे तुझें राज्य तुला परत मिळेल. हें वस्त्र घे. हें परिधान करून माझें स्मरण केलेंस कीं तुझें पूर्वीचें रूप तुला परत प्राप्त होईल."

सर्पाच्या सांगण्याप्रमाणें नल अयोध्या नगरींत येऊन ऋतुपर्ण राजाजवळ बाहुक या नांवानें सारथ्याचें काम करून राहूं लागला. याच राजाजवळ नलाचा सारथी वार्ष्णेय पूर्वींच येऊन राहिला होता. पण नलाच्या स्वरूपांत पालट झाल्यामुळें त्यानें आपल्या धन्याला ओळखलें नाहीं.

## दमयंतीचा शोध

आपली मुलगी दमयंती आणि जांवई नल यांचा भीमक राजानें सारखा शोध चालविला होता. पण अजूनही त्याला कांहीं शोध लागला नव्हता. सुदेव नांवाचा एक ब्राह्मण दमयंतीच्या शोधासाठीं निघाला होता. तो फिरत फिरत चेदि नगरांत येऊन दाखल झाला. तो नगरांत आला तेव्हां चेदि राजा पुण्याहवाचन करीत होता. ब्राह्मण तेथें गेला तेव्हां सुनंदेबरोबर उभी असलेली दमयंती त्याच्या दृष्टीला पडली. दमयंतीला सुदेवानें ओळखली. तिचें पूर्वींचें रूप आणि वैभव तिच्या शरीरावर दिसत नसलें तरी ती खास दमयंतीच असावी असें त्याला वाटलें.

त्यानें दमयंतीला एकटी गांठून हळूच म्हटलें, " हे दमयंती, मी तुझ्या बंधूचा प्रियमित्र सुदेव ब्राह्मण असून तुझ्या शोधासाठीं त्रिखंड हिंडत आहें. तुझीं मातापितरें तुझ्यासाठीं दीन होऊन राहिलीं आहेत. सर्वत्र ब्राह्मण पाठवून तुमचा शोध चालला आहे. "

सुदेवाला दमयंतीनें ओळखलें. तिनें सर्वांची खुशाली विचारली आणि मुलांची आठवण होऊन ती रडूं लागली.

आपली सखी कुणा ब्राह्मणाबरोबर बोलत असतां रडत आहे असें पाहून सुनंदेला वाईट वाटलें. ती आपल्या आईला म्हणाली, " आई, माझी प्रिय सखी रडत आहे. तूं तिची चौकशी करून तिचें दुःख नाहींसें कर. "

राजमातेनें सुदेवाला बोलावून आणून चौकशी केली. सुदेवानें दमयंती कुणाची कोण वगैरे सर्व हकीकत राजमातेला सांगितली आणि खुणेसाठीं दमयंतीच्या अंगावर लासें असल्याचें सांगितलें. लगेच दमयंतीला बोलावून आणून तिच्या अंगावर लासें आहे कीं नाहीं तें राजमातेनें पाहिलें. दैन्यामुळें त्या लाशावर मलीनपणा आला होता. तो पुसून स्वच्छ करतांच लासें स्पष्ट दिसूं लागलें. राजमातेला आनंद झाला. तिनें प्रेमभरानें दमयंतीला पोटाशीं धरलें आणि म्हटलें, " बाळे, तूं कुणी परकी का आहेस ? अग मी तुझी मावशी. तुझी आई आणि मी बहिणी बहिणी. तुझ्या जन्माच्या वेळीं काय ती मीं तुला पाहिली होती. मोठ्या विचित्र योगायोगानें तूं माझ्या घरीं आलीस. "

दमयंतीनें आपल्या मावशीला नमस्कार केला. सुनंदा

तर आतां बहिणीच्या नात्यानें दमयंतीशीं वागूं लागली. सर्वांना आनंद झाला. चेदिराजाला आपली मावसबहीण भेटल्यामुळें आनंद झाला.

दमयंतीबरोबर मोठा लवाजमा देऊन राजमातेनें तिच्या इच्छेप्रमाणें विदर्भ देशीं तिच्या माहेरीं पोंचती केली.

पित्याच्या घरीं आल्यावर दमयंती आपल्या मुलांना आणि आईबापांना भेटली. तिला पाहून सर्वांना आनंद झाला. सुदेव ब्राह्मणाला राजानें खूप द्रव्य देऊन संतुष्ट केलें.

## पतीचा शोध

एक रात्र विश्रांति घेतल्यावर दमयंती दुसरे दिवशीं आपल्या आईला म्हणाली, " आई, मी जिवंत राहावें अशी तुझी इच्छा असली तर माझ्या नलाला शोधून आण. त्याच्या-वांचून मी जिवंत राहाणार नाहीं. "

तिच्या आईनें आपल्या पतीला मुलीचें दुःख सांगितलें. राजानें जांवयाच्या शोधासाठीं चोहोंकडे माणसें पाठविलीं.

जे ब्राह्मण नलाच्या शोधाला निघाले त्यांना दमयंती म्हणाली, " नलाचा शोध कशा रीतीनें करायचा तें मी तुम्हाला सांगतें तें लक्षांत ठेवा. मुख्य मुख्य नगरांत जाऊन जेथें पुष्कळ लोकांची गर्दी दिसेल तेथें जाऊन मोठ्यानें ओरडून म्हणा कीं, ' तुझ्यावर अनुरक्त असणारी तुझी प्रिया अरण्यामधें झोंपली असतां तिचें अर्धें वस्त्र कापून घेऊन तिला सोडून देऊन तूं कुठें बरें गेला आहेस ? तुझी प्रिया त्या अर्ध्या वस्त्रानें अजूनही तुझी वाट पाहात आहे. तिला तूं काय तें उत्तर दे ! ' तुम्ही असें

बोलूं लागलां कीं कुणीतरी तुमची विशेष चौकशी करील किंवा त्या प्रियकराची तरफदारी करणारें कांहीं बोलेल. अशा वेळीं त्या माणसावर चांगलें लक्ष ठेवून तो कोण आहे, कुठें राहातो याचा बारकाईनें तपास करून मला कळवा."

दमयंतीच्या सूचना घेऊन ते ब्राह्मण चारी दिशांना निघून गेले. तिच्या सांगण्याप्रमाणें ते जनसमूहांत बोलूं लागले. नलाचा चोहींकडे सारखा शोध चालला होता.

पर्णाद नांवाचा एक ब्राह्मण या शोध करणाऱ्या मंडळींत होता. तो लवकरच परत येऊन दमयंतीला सांगूं लागला— "अयोध्या नगरींत मी ऋतुपर्ण राजाच्या सभेंत जाऊन तूं सांगितल्याप्रमाणें भाषण केलें. पण कोणी मला उत्तर दिलें नाहीं. पण त्या राजाचा बाहुक नांवाचा सारथी आहे त्यानें मात्र मला एकांतांत उत्तर दिलें. पण हा बाहुक दिसायला विद्रूप असून नलासारखा मुळींच दिसत नाहीं. तो सारथ्याच्या कामांत चतुर आहे. स्वयंपाकही तो चांगला करतो. तो दुःखाचे उसासे सोडून मला म्हणाला, कीं, संकटांत सांपडल्यामुळें आणि सुखापासून भ्रष्ट झाल्यामुळें त्या मूर्खानें जो त्या स्त्रीचा त्याग केला त्याबद्दल तिनें रागावणें योग्य नाहीं. मानसिक दुःखानें तो होरपळून गेला होता. राज्यभ्रष्ट, संपत्तिशून्य, भुकेलेला आणि सदा दुःखी असा तिचा पति आहे. तेव्हां अशा पतीवर त्या स्त्रीनें राग करूं नये असें मला वाटतें."

पर्णादानें सांगितलेली हकीकत ऐकून दमयंतीचे डोळे पाण्यानें भरून आले. आपल्या पतीशिवाय असें चतुर भाषण करणारा दुसरा कुणी असणार नाहीं असें तिला वाटलें.

कांहीं वेळ विचार करून ती आपल्या आईला म्हणाली, "आई, मीं एक योजना ठरविली आहे त्यांत तुझें मला सहाय्य पाहिजे. मात्र त्यांतलें एक अक्षरही कुणाच्या कानीं जातां कामा नये. बाबांनाही यांतलें कांहीं कळतां कामा नये."

दमयंतीच्या आईनें मुलीच्या सांगण्याप्रमाणें वागण्याचें कबुल केलें. दमयंतीनेंही आपल्या आईला आपण काय करणार आहे तें समजावून सांगितलें.

नंतर तिनें सुदेव ब्राह्मणाला बोलवायला पाठविलें. सुदेव आला. आपल्या आईच्या समक्ष ती सुदेवाला म्हणाली, "सुदेवा, तूं आतां प्रवासाला जाण्याची तयारी कर. येथून अयोध्या नगरींत जा. तेथें ऋतुपर्ण राजाच्या राजसभेंत जाऊन तूं राजाला असें सांग कीं, भीमककन्या दमयंती पुनः स्वयंवर करणार असून सर्व राजे तिकडे जात आहेत. उद्यांच स्वयंवर आहे. तेव्हां तुला तिकडे जाणें असल्यास त्वरित जा. उद्यां सूर्योदय झाला कीं ती दुसरा पति करणार आहे. तिच्या पतीचा कांहीं शोध लागत नाहीं."

सुदेव लगेच अयोध्येला जाण्यास निघाला. तेथें जाऊन पोंचल्यावर त्यानें 'उद्यां दमयंतीचें स्वयंवर आहे' अशी बातमी पसरविली आणि राजालाही कळविलें.

## पतीची भेट

ऋतुपर्ण राजानें दमयंतीच्या स्वयंवरास जाण्याचें ठरविलें. अगदीं थोड्या वेळांत विदर्भ देशांत जाऊन पोंचायचें असल्यामुळें लगेच त्यानें बाहुकाला रथ तयार ठेवण्यास सांगितलें.

राजाची आज्ञा ऐकून नळाला वाईट वाटलें. दमयंती स्वयंवर करीत आहे ही बातमी त्याला अतिशय दु:खदायक वाटली. आपल्यावरील तिचें प्रेम नष्ट झालें कीं काय असें त्याला वाटलें. त्याला असें होणें शक्यच नाहीं असें वाटत होतें. पण स्वयंवराची तर बातमी पसरलेली. काय करावें हें त्याला सुचेना. त्यानें खिन्न मनानें रथ तयार केला आणि ऋतुपर्ण राजाला घेऊन तो निघाला. नळानें जेव्हां रथ चालविला तेव्हां त्याचा जो आवाज झाला तो ऐकून वार्ष्णेय चमकला. हा आवाज नळाशिवाय दुसरा कोण करूं शकणार, असें त्याच्या मनांत आलें. खात्रीनें हा नळच असला पाहिजे अशी त्याच्या मनाची खात्री झाली. आपला धनी गुप्तरूपानें येथें येऊन राहिला आहे असें त्याच्या मनानें घेतलें.

राजाचा रथ चालला असतां वाटेंत त्यांना एक बेहड्याचा वृक्ष दिसला. त्या वृक्षाकडे पाहून राजा म्हणाला, “ बाहुका, या वृक्षावर जीं फळें आणि पानें आहेत तीं या खालीं पडलेल्या पानांहून एकशें एक या संख्येनें अधिक आहेत. तसेंच या दोन फांद्यांना पांच कोटी पानें आहेत. या दोन फांद्यांना दोन हजार पंचाणव फळें आहेत.”

त्यावर बाहुक राजाला म्हणाला, “ राजा, तुझें सांगणें बरोबर आहे कीं नाहीं हें मी प्रत्यक्षच पाहातों. तोंपर्यंत दोन घटका हा वार्ष्णेय घोड्यांच्या काडण्या धरील.”

“ छे ! छे ! असा विलंब करून चालणार नाहीं.” राजा म्हणाला.

"मीं मोजून पाहायचें ठरविलेंच आहे. तुला घाई असली तर वार्ष्णेयाला घेऊन तूं विदर्भाला जा. मी येथें मोजत बसतों."

राजानें त्याला पुष्कळ सांगून पाहिलें पण बाहुक ऐकेना.

"अरे, सूर्यास्तापूर्वी मला तूंच घेऊन जाऊं शकशील."

"मग मी एक फांदी तरी मोजून पाहातों."

राजानें निरुपायानें त्याला संमति दिली. फांदीच्या पानांची आणि फळांची गणना बरोबर आहे असें पाहून नलाला आश्चर्य वाटलें. ही विद्या शिकण्याची इच्छा नलानें व्यक्त केली. राजाला घाई असली तरी त्यानें नलाची आपणास जरुरी आहे असें जाणून त्याला अक्षविद्या शिकविली. नलानेंही अश्वविद्या राजाला शिकविली.

यावेळीं नलाच्या शरीरांत घर करून राहिलेला कली बाहेर पडला आणि बेहड्याच्या झाडांत संचार करून राहिला. नलाच्या अंगांतून कली बाहेर पडल्यामुळें नल शुद्ध झाला. त्याच्या बुद्धीवरील भ्रांत निघून गेली. मोठ्या उत्साहानें तो रथ हांकूं लागला.

विदर्भ देशाच्या राजनगरीमध्यें जेव्हां राजाचा रथ आला तेव्हां त्या रथाचा गडगडाट ऐकून दमयंतीला आनंद वाटला. तो आवाज तिला परिचित होता. जणुं नलच येत आहे असें तिला वाटलें. नलाला पाहाण्यासाठीं ती गच्चीवर जाऊन उभी राहिली. पण रथांतून उतरलेल्या तीन पुरुषांत तिचा नल कांहीं तिला कुठें दिसला नाहीं.

भीमकराजानें ऋतुपर्ण राजाचें स्वागत केलें आणि कोणत्या हेतूनें येणें झालें याबद्दल चौकशी केली. त्यामुळें ऋतुपर्ण राजा भांबावला. त्याला स्वयंवराचीही कुठेंच कांहीं तयारी दिसली नाहीं. त्यामुळें स्वयंवरासाठीं आलों असें कांहीं तो म्हणाला नाहीं. आपल्या दर्शनासाठीं आलों आहें असें त्यानें उत्तर दिलें. भीमकराजाचें त्यामुळें कांहीं समाधान झालें नाहीं. पण त्यानेंही अधिक चौकशी केली नाहीं. त्यानें ऋतुपर्ण आणि त्याचीं माणसें यांची व्यवस्था केली. बाहुक रथशाळेमध्यें जाऊन राहिला.

दमयंतीला कांहींच सुचेना. नल येण्यासाठीं आपण युक्ति केली. पण तो तर कुठें दिसत नाहीं. आतां काय करावें याचा ती विचार करूं लागली. तिनें तो सारथी कोण असावा याची चौकशी करण्यासाठीं आपली केशिनी नांवाची दासी पाठविली. केशिनी बाहुकाकडे जाऊन त्याच्याशीं अनेक प्रकारच्या गोष्टी करूं लागली. दमयंतीच्या दुर्दैवाबद्दलही तिनें गोष्ट काढली. तेव्हां पर्णाद ब्राह्मणाजवळ बाहुक जें बोलला होता, तोच उपदेश त्यानें याही वेळीं केला. आणि तो उपदेश करीत असतां दुःखावेग अनावर होऊन बाहुक रडूं लागला.

आणि दासीच्या तोंडून ही हकीकत जेव्हां दमयंतीला समजली तेव्हां तो नलच असावा असा तिला संशय आला. तिनें केशिनीला नलाकडे पुनः पाठविलें.

केशिनी परत आल्यावर दमयंतीला सांगूं लागली, "असा मनुष्य मीं आजवर कुठेंच पाहिलेला नाहीं. ज्या दारांतून त्याला जायचें असेल तें लहान असलें तरी त्याला वांकावें लागत नाहीं. तें दारच मोठें होतें. गर्दीतूनही त्याला

मोठी वाट मिळते. रिकाम्या घागरींकडे बाहुकानें पाहातांच त्या पाण्यानें अगदीं भरून गेल्या. मूठभर गवत घेऊन त्यानें सूर्य-किरणांत धरतांच तें पेटलें आणि त्यानें अग्नि तयार केला. आगीचा स्पर्श त्याला भाजीत नाहीं. त्यानें इच्छा करतांच पाणी उत्पन्न होतें. आणखी एक मोठें आश्चर्य मीं असें पाहिलें कीं, बाहुक हातांत फुलें घेऊन चोळूं लागला तों तीं फुलें जास्त सुगंधी आणि टवटवीत झालीं. केवढें हें आश्चर्य! हा कुणीतरी देवदूत दिसतो बाई!"

दासीच्या तोंडची ही हकीकत ऐकून दमयंतीची खात्रीच झाली कीं तो नलच असला पाहिजे. इंद्रादि देवांनीं त्याला जे वर दिले होते त्यामुळें त्याला पाणी आणि अग्नि उत्पन्न करतां येत होतीं.

बाहुकरूपानेंच नल आला आहे हें दमयंतीनें ओळखलें. पण तिला आणखी खात्री करून घ्यायची होती. ती दासीला म्हणाली, "तूं पुनः तेथें जा आणि नलाची नज़र चुकवून त्यानें रांधलेला स्वयंपाक थोडासा घेऊन ये!"

दासी लगेच निघून गेली आणि थोड्या वेळानें स्वयंपाक घेऊन आली. दमयंतीनें त्याची चव घेऊन पाहिली. नलाच्या स्वयंपाकाला जशी चव असे तशी त्याला होती. तिला आनंद झाला. मोठ्या उत्साहानें ती केशिनीला म्हणाली, "बाई, आतां एकदांच जाऊन ये. माझ्या दोन्ही मुलांना बरोबर घेऊन जा. आणि बाहुकाच्या चेहऱ्यावर काय परिणाम होतो तें बारकाईनें पाहून ये!"

केशिनी दमयंतीच्या दोन्ही मुलांना घेऊन अश्वशाळेंत गेली. त्या दोन्ही मुलांना पाहातांच बाहुकाचें मन वात्सल्यानें भरून आलें. त्याला राहवलें नाहीं. त्या मुलांना जवळ घेऊन



तो रडूं लागला. रडत रडत तो केशिनीला म्हणाला, " या गोजिरवाण्या मुलांना पाहून माझ्या मुलांची मला आठवण झाली. म्हणून मला रडूं येत आहे. केशिनी, तूं आतां येथून जा कशी. पुनः इकडे येऊं नकोस. लोक नांवें ठेवतील. "

दासी परत आली. घडलेली हकीकत तिनें दमयंतीला सांगितली. आतां कांहींच संशय उरला नव्हता. दमयंतीनें नलाला भेटण्याचें ठरविलें. तिनें आपल्या आईला सर्व हकीकत सांगून भीमक राजाचीही परवानगी मिळाविली. लगेच बाहुकाला निरोप पाठवून दमयंतीनें आपल्या मंदिरांत त्याला आणलें. दमयंतीला

पाहतांच नलाला आपला शोक आवरतां आला नाहीं. त्याचे डोळे दुःखाश्रूंनीं भरून आले. दमयंतीही रडूं लागली.

दुःखाचा वेग आवरल्यावर दोघांनींही आपापली हकीकत एकमेकांना सांगितली. कलीचा प्रवेश आपल्या देहांत झाल्यामुळें आपली बुद्धि फिरली असें दमयंतीला सांगून नलानें तिचें सांत्वन केलें.

दमयंती पुनः स्वयंवर करणार ही वार्ता, नलानें प्रकट होण्यासाठीं ऋतुपर्णाच्या दरबारांत सांगितली गेली होती. हें जेव्हां नलाला कळलें तेव्हां त्याला समाधान वाटलें. कर्कोटक नागानें दिलेलें वस्त्र नलानें नंतर परिधान केलें आणि नागाचें भक्तिपूर्वक स्मरण करतांच नलाला त्याचें पूर्वीचें रूप प्राप्त झालें.

नलाला त्याचें पूर्वीचें रूप प्राप्त झालेलें पाहून दमयंतीनें प्रेमभरानें त्याला आलिंगन दिलें. तिचा दुःखभार हलका झाला.

भीमक राजानें जावयाचा सत्कार केला. ऋतुपर्ण राजानें नलाचा मोठ्या प्रेमानें निरोप घेऊन अयोध्येला प्रयाण केलें.

## नलाला राज्यप्राप्ति

भीमकाच्या घरीं एक महिना राहून नल आपल्या परिवारासह निषध देशांत येऊन दाखल झाला. आतां तो द्यूतविद्येंत प्रवीण झाला होता. पुष्कराला त्यानें पुनः द्यूत खेळण्याचें आव्हान दिलें. पुष्करानें हें आव्हान स्वीकारलें. पण त्यांत पुष्कराचा पराजय झाला. त्यानें शेवटीं आपले प्राणही पणाला लावले. त्यांतही तो हरला. नलानें त्याला जीवदान देऊन सोडून दिलें.

अशा रीतीनें नलाला आपलें पूर्ववैभव मिळालें. नागरिकांना अतिशय आनंद झाला.

---

## वातापीचा वध

( पांडव काम्यक वनांत राहात होते. पण अर्जुनाच्या वियोगामुळें त्यांना तेथें चैन पडेना. सर्वांना अर्जुनाची सारखी आठवण होऊं लागली. द्रौपदी तर विशेष उदास दिसूं लागली. काम्यक वन सोडून दुसरीकडे कुठें तरी राहायला जावें असें त्यांना वाटूं लागलें. नारद आणि धौम्य मुनि यांनीं त्यांना तीर्थयात्रा करण्यास जावें असें सुचविलें. त्याप्रमाणें पांडव काम्यक वन सोडून निघाले. ते अनेक ठिकाणचीं तीर्थें करीत चालले होते. ते अगस्त्य मुनीच्या आश्रमाजवळील मणीमती नगरांत आले. तेथें लोमश मुनीनें धर्माला अगस्त्य मुनीचें चरित्र सांगितलें )

मणीमती नगरीमध्यें पूर्वीं इल्वल नांवाचा दैत्य होता. त्याला वातापी नांवाचा एक भाऊही होता. हे दोघे दैत्य उन्मत्त होऊन ब्राह्मणांना छळीत असत. वातापी मेंढ्याचें रूप घेई आणि त्या मेंढ्याला मारून त्याचें मांस इल्वल ब्राह्मणांना खायला घाली ! ब्राह्मणांनीं मांस भक्षण केल्यावर इल्वल वातापीला हांक मारी. मग वातापी ब्राह्मणांचीं पोटें फाडून बाहेर निघे आणि ब्राह्मण ठार होत ! अशा प्रकारें ते दोघे भाऊ ब्राह्मणांना छळीत होते.

एकदां अगस्त्य मुनींना पितरांच्या उद्धारासाठीं विवाह करावा असें वाटलें. त्यांनीं लोपामुद्रेशीं विवाह केला. लोपामुद्रेनें अगस्त्यांना पुष्कळसें द्रव्य आणायला सांगितलें. अगस्त्य

मुनि राजाजवळ द्रव्य मागायला गेले. पण कुणाही राजाजवळ पुरून उरेल इतकी संपत्ति नव्हती. जमा आणि खर्च सारखींच होत होतीं. यामुळें प्रजेला त्रास होईल म्हणून त्यांतील द्रव्य अगस्त्यांनीं घेतलें नाहीं.

इतक्यांत अगस्त्य मुनींना कोणींतरी सांगितलें, कीं इल्वल आणि वातापी या बंधूंजवळ विपुल धन आहे. अगस्त्य मुनि त्यांच्याकडे द्रव्य मागायला गेले. अगस्त्य मुनींचा दैत्यांनीं चांगला सत्कार केला. इल्वलानें पूर्वीप्रमाणें अगस्त्यांना मांस वाढलें. त्याचें कपट अगस्त्यांच्या लक्षांत आलें होतें. त्यांनीं मांस भक्षण केल्यावर पोटावरून हात फिरवून भक्षण केलेल्या वातापीला जिरवून टाकलें ! इल्वलानें "वातापी ये" अशी हांक मारली पण तो कसला बाहेर येतो ?

अगत्स्य मुनि हंसून इल्वलाला म्हणाले, "दैत्या, तुझें कपट मीं ओळखलें होतें. वातापी माझ्या पोटांत केव्हांच जिरून गेला आहे. त्याच्या येण्याची तूं आतां वाट पाहूं नकोस."

इल्वलानें हात जोडून अगस्त्य मुनींची क्षमा मागितली आणि त्यांना अपार द्रव्य दिलें. द्रव्य घेऊन मुनि आपल्या आश्रमाकडे आले. त्यांनीं तें द्रव्य लोपामुद्रेजवळ दिलें.

---

## वृत्रासुराचा वध

अगस्त्य मुनींच्या काळीं कालकेय नांवाचे महाबलाढ्य दैत्य होऊन गेले. त्यांचा मुख्य वृत्रासुर नांवाचा पराक्रमी दैत्य होता. इंद्रालाही तो भारी होता. दधीचि ऋषींनीं आपल्या

अस्थि दिल्या तर त्यांपासून वृत्रासुराचा वध होईल असें ब्रह्मदेवानें सांगितलें. तेव्हां सर्व देव दधीचि ऋषीकडे जाऊन



म्हणाले, "हे मुनी, वृत्रासुर फार प्रबळ झाला असून तो सर्वांना छळीत आहे. तुझ्या अस्थि जर मिळाल्या तर त्याचा वध होऊन सर्वांचें रक्षण होईल."

दधीचि ऋषि म्हणाले, "माझ्या अस्थींमुळें जर जगाचें कल्याण होत असेल तर माझ्या देहाचें सार्थकच झालें म्हणायचें. मी माझ्या अस्थि द्यायला तयार आहें." असें म्हणून

दधीचि ऋषि मृत होऊन पडले. देवांनीं त्यांचीं हाडें काढून घेतलीं. विश्वकर्म्यानें त्यापासून वज्र निर्माण केलें. या वज्राच्या साहाय्यानें इंद्रानें वृत्रासुराचा वध केला. वृत्रासुराचा वध झालेला पाहातांच कालकेय दैत्य समुद्रांत जाऊन दडून बसले. समुद्रांत राहून ते लोकांना छळूं लागले. ते ऋषींच्या आश्रमांत शिरून त्यांना भक्षण करूं लागले. तेव्हां त्यांचें पारिपत्य करायचें तर आधीं समुद्र आटवून टाकला पाहिजे असें देवांनीं ठरविलें. अगस्त्य मुनि एकटे समुद्र प्राशन करण्यास समर्थ होते. देवांनीं त्यांची प्रार्थना केली. तेव्हां अगस्त्य मुनि समुद्राकडे गेले आणि त्यांनीं तो समुद्र पिऊन टाकला !

समुद्रांतील पाणी नाहींसें झाल्यामुळें दैत्य उघडे पडले. देवांनीं त्यांचा वध केला. दैत्यांचा नाश झाल्यावर पुनः समुद्र निर्माण करण्याविषयीं देवांनीं अगस्त्य मुनींची प्रार्थना केली. तेव्हां अगस्त्य म्हणाले, “ मीं तें सर्व पाणी पचवून टाकलें आहे. दुसऱ्या कोणत्या तरी उपायानें तुम्ही समुद्र निर्माण करा. ” पुढें भगीरथ राजानें स्वर्गलोकींची गंगा पृथ्वीवर आणली त्यामुळें समुद्रांत पुनः पाणी आलें.

---

## गंगावतरण

पूर्वीं ‘ सगर ’ नांवाचा एक महापराक्रमी राजा होऊन गेला. त्याला वैदर्भी आणि शैब्या अशा दोन राण्या होत्या. शंकराच्या कृपेनें त्याला एका राणीपासून साठ हजार आणि दुसऱ्या राणीपासून एक असे साठ हजार एक मुलगे झाले. साठ हजार

सगरपुत्र मोठे पराक्रमी होते. सगर राजानें अश्वमेध यज्ञ केला तेव्हां अश्वाचें रक्षण करण्यासाठीं हे साठ हजार पुत्र त्याच्याबरोबर फिरत होते. ते फिरत फिरत चालले असतां एकाएकीं अश्व कोठें नाहींसा झाला असें त्यांना आढळून आलें. अगस्त्य मुनीनें आटविलेल्या समुद्राजवळ हा अश्व नाहींसा झाला होता.

त्या ठिकाणीं समुद्राला एक मोठी भेग होती. ती सगरपुत्रांनीं खणण्यास सुरवात केली. खणत खणत ते पाताळांत जाऊन दाखल झाले. तेथें कपिलमुनीजवळ अश्व असलेला त्यांनीं पाहिला. आपल्या अश्वाला पकडण्यासाठीं ते धांवले. तों कपिल मुनींनीं डोळे उघडून आपल्या प्रखर तेजानें त्या साठ हजार सगरपुत्रांना जाळून टाकलें !

आपले पुत्र कपिल मुनींच्या तेजानें भस्म होऊन गेले, ही हकीकत सगर राजाला नारदाकडून कळली. त्यानें आपला नातू अंशुमान याला अश्व शोधून आणण्यासाठीं पुनः पाठविलें. अंशुमान फिरत फिरत कपिल मुनींकडे येऊन दाखल झाला. त्यानें कपिल मुनींची स्तुति करून त्यांची कृपा संपादन केली. मुनींनीं त्याला अश्व परत दिला. आणि पुढें "भगीरथ" नांवाचा तुमचा वंशज मृत सगरपुत्रांचा उद्धार करील असें सांगितलें. अंशुमान अश्व घेऊन परत आला.

पुढें भगीरथ नांवाच्या या सगर राजाच्या एका वंशज राजानें मोठें तप करून गंगेला प्रसन्न करून घेतलें. गंगा पृथ्वीवर येण्यास तयार झाली. स्वर्गांतून वाहाणारा गंगेचा प्रवाह आपल्या शिरावर वाहाण्याचें शंकरानें कबूल केलें. अशा रीतीनें

गंगा स्वर्गांतून वाहात पृथ्वीवर आली. भगीरथ तिला घेऊन आपले पूर्वज जेथें मृत झाले होते तेथें गेला. त्यामुळें वाटेंतील कोरडा समुद्रही पाण्यानें भरून गेला. भगीरथाचे पूर्वज गंगेच्या जलानें शुद्ध होऊन स्वर्गलोकीं गेले.

---


# ऋष्यशृंग मुनि

(पांडवांनी भगीरथाचें चरित्र ऐकल्यावर ते पुढें अनेक तीर्थें फिरूं लागले. फिरत फिरत ते हेमकूट पर्वताकडे आले. कौशिका नदीच्या कांठीं ऋषींचे अनेक आश्रम पाहून त्यांना मोठा आनंद वाटला. तेथें विभांडक ऋषींचा आश्रम होता. या विभांडक ऋषींचा मुलगा ऋष्यशृंग याची हकीकत लोमशमुनीनें त्यांना सांगितली)

काश्यप मुनींचा मुलगा विभांडक यांना ऋष्यशृंग नांवाचा एक महा तेजस्वी पुत्र होता. तो आपल्या पित्यासह मोठ्या आनंदानें राहात होता. त्यानें आपल्या पित्याखेरीज कोणीही पुरुष वा स्त्री पाहिली नव्हती. एकदां दशरथ राजाचा मित्र अंगदेशचा राजा लोमपाद याच्या राज्यांत दुष्काळ पडला. पाऊस पडेना. पीक येईना. लोक उपासानें मरूं लागले. तेव्हां तो ब्राह्मणांना शरण गेला. ब्राह्मणांनीं त्याला सांगितलें, “ विभांडक मुनीचा मुलगा ऋष्यशृंग याच्यासारखा सरल हृदयाचा महातेजस्वी मुनि जर तुझ्या राज्यांत येईल तर खूप पाऊस पडेल. दुष्काळाचें निवारण होईल. ”

लोमपाद राजानें आपल्या राज्यांतील सुंदर सुंदर वेश्यांना बोलावून आणून ऋष्यशृंगाला मोह पाडून आणण्यास सांगितलें.

एका सजविलेल्या होडींत बसून एक वेश्या ऋषीच्या आश्रमाकडे



गेली. तिनें होडी आश्रमासारखी सजविली होती. ती वेश्या ऋषिकुमाराकडे जाऊन त्याच्या जवळ उभी राहिली.

त्यानें यापूर्वी स्त्री कधींच पाहिली नव्हती. तसेंच आलेली कुणी स्त्री आहे हेंही त्याला माहीत नव्हतें. त्याला वाटलें ही वेश्या म्हणजे कुणीतरी ऋषिच असावा. तिचा सुंदर देह, मोह पाडणारे डोळे, मृदु अंगकांति, गोड बोलणें आणि हावभाव यांनीं ऋषिपुत्र मोहून गेला. त्याला कसेंसेंच होऊं लागलें. आपल्याला काय होत आहे हें त्याला कळेना. ऋषिकुमाराला असें मोहांत पाडून ती वेश्या तेथून निघून गेली. ती गेल्यापासून तो अगदीं वेडावून गेला. तिच्या दर्शनासाठीं आतुर झाला.

विभांडक ऋषि आश्रमामध्यें परत आले. त्यांनीं आपल्या

मुलाची ती मोहावस्था पाहून त्याची चौकशी केली. ऋष्य-शृंगानें घडलेली हकीकत त्यांना सांगितली. विभांडकांना वाटलें कुणातरी मायावी राक्षसाचें हें काम असावें. त्यांनीं आपल्या मुलाला अशा राक्षसाचें दर्शनही घेऊं नये असें सांगितलें. पण मुलाच्या मनावर त्याचा कांहीं परिणाम झाला नाहीं. तो त्या वेश्येची वाट पाहात काळ घालवूं लागला.

पुढें एकदां विभांडक ऋषि आश्रमाबाहेर गेले आहेत असें पाहून ती वेश्या पुनः तेथें आली. तिला पाहून तो धांव-तच तिच्याकडे जाऊन तिला कुरवाळूं लागला. या खेपेलाही त्या वेश्येनें त्याला मोह पडेल अशीं कृत्यें केलीं आणि हळू हळू त्याला आपल्या नादीं लावत होडींत नेलें. तेथून होडी हळू हळू पलीकडे गेली आणि लोमपाद राजाच्या राज्यांत ऋष्यशृंगाचा प्रवेश झाला. राजानें त्याचा मोठा सत्कार करून आपली शांता नांवाची कन्या त्याला अर्पण केली. आतां खूप पाऊस पडूं लागला. लोक आनंदित झाले.

इकडे विभांडक ऋषि बाहेर गेले होते ते कांहीं दिव-सांनीं परत आश्रमांत आले आणि आपला मुलगा कोठें नाहींसा झालेला पाहून त्यांना मोठें दुःख झालें. ते त्याचा शोध करूं लागले. तेव्हां त्यांना कळलें, कीं आपल्या मुलाला मोह पाडून लोमपाद राजानें नेलें आहे. राजाचा त्यांना राग आला. त्याला शाप देण्यासाठीं विभांडक ऋषि राजाकडे जाऊं लागले. वाटेंत विभांडक ऋषींना तहान लागली. ऋषीचा राग शांत करण्याची व्यवस्था राजानें जागोजाग केलीच होती. पाणी

पिण्यासाठीं विभांडक गौळीवाड्यांत गेले. तेथें गवळ्यांनीं त्यांची खूपच व्यवस्था ठेवली. ऋषींचा राग बराच कमी झाला. त्यांनीं विचारलें, " अरे, तुम्हीं माझा चांगलाच सत्कार केला. तुम्ही कुणाचे रे ? "

ते गवळी उत्तरले, " महाराज, हें सारें वैभव आपला पुत्र ऋष्यशृंग याचें आहे. "

त्यांच्या या उत्तरामुळें ऋषि फारच खूष होऊन गेले. ते तेथून निघाले. वाटेंत ठिकठिकाणीं त्यांचा असाच सत्कार होत होता. राजाच्या सभेंत ऋषि येऊन दाखल झाले. तेथें राजानें त्यांची पूजा केली. आपला मुलगा आणि सून यांना विभांडकांनीं पाहिलें. ते आपला राग अगदीं विसरून गेले.

राजाला चांगले आशीर्वाद देऊन ते परत आश्रमांत गेले. ऋष्यशृंगाच्या डोकीवर एक शिंग होतें म्हणून त्याला ऋष्यशृंग असें म्हणत असत.

म. ग्रं. ... वाचनालय ठाणे.
वा. क्र. ३९८७८ नों. दि ...
वि. ...ग्रा... क्र. ...

IRBK-0101978

IRBK-0101978

# सुलभ महाभारत

## भाग पांचवा

सुलभ महाभारत या मालेतून महाभारतातील सुरस कथा क्रमाक्रमानें प्रसिद्ध होतील. विद्यार्थी, खेड्यांतील साधारण शिकलेले लोक आणि प्रौढ साक्षर यांना या कथा खचित आवडतील अशी यांची रचना केली आहे. प्रत्येक भाग आपापल्या परीनें स्वतंत्र असल्यामुळें कोणताही भाग वाचायला घेतला तरी चालेल.

पुढील भागही क्रमाक्रमानें लवकरच प्रसिद्ध होतील.

